# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.10.2025** **वारःगुरूवार**

---

१. देशातली बंदरं, विकसनशील जगात सर्वात कार्यक्षम असल्याचे पंतप्रधानांचे गौरवोद्गार,

२.कैंद्राच्या धर्तीवर राज्यातही 'राज्य उत्पादन अभियान' सुरू करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा,

३.राज्य परिवहन महामंडळाला यंदाच्या दिवाळीत ३०१ कोटी रुपये विक्रमी उत्पन्न

आणि

४.भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यानचा वीस षटकांचा पहिला सामना पावसामुळे रद्द.

**<u>सागरी सप्ताह मोदी</u>**

भारताचं सागरी क्षेत्र वेगानं आणि उर्जेनं प्रगती करत असून, आज भारताची बंदरं विकसनशील जगात सर्वात कार्यक्षम म्हणून गणली जातात, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आयोजित ,भारत समुद्री सप्ताह २०२५ या जागतिक सागरी परिषदेत ते काल बोलत होते. जागतिक सागरी मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाचं अध्यक्षपदही त्यांनी भूषविलं. सागरी क्षेत्रातला विकास हा संधीची नवी दारं खुली करतो, हे लक्षात घेणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ,सागरी सुरक्षेबाबतच्या दूरदृष्टीची प्रशंसा करताना पंतप्रधान म्हणाले,

"भारतीय बंदरं अनेक बाबींमध्ये विकसित जगातील बंदरांपेक्षाही चांगली कामगिरी करत आहेत. सरकारनं ब्रिटिशकालीन शिपिंग कायद्यांमध्ये सुधारणा केली असून त्यांची जागा आता २१ व्या

शतकासाठी उपयुक्त असलेल्या आधुनिक, भविष्यकालीन कायद्यांनी घेतली आहे”, असं सांगून या क्षेत्रात भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

ही परिषद या क्षेत्रातील बदलांच्या संवादासाठी महत्त्वाचा, उपयुक्त मंच ठरल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>मुख्यमंत्री यशदा</u>**

“केंद्र सरकार राष्ट्रीय उत्पादन अभियान अर्थात नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग मिशन सुरू करत असताना, महाराष्ट्र शासनही ‘राज्य उत्पादन अभियान’ सुरू करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात जागतिक दर्जाची ‘ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट’ स्थापन करण्यात येईल, असंही त्यांनी घोषित केलं. औद्योगिक उत्पादन क्षेत्रात भारताला जगात आघाडीवर नेण्याच्या दृष्टीनं, नीती आयोगानं तयार केलेल्या दिशादर्शक आराखडा अर्थात रोडमॅपचं प्रकाशन काल पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

औद्योगिक उत्पादन क्षेत्रात महाराष्ट्राला मोठी संधी असून, देश याबाबतीत जगाचं नेतृत्व करेल, तेव्हा महाराष्ट्र देशात आघाडीवर असेल असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले,

**<u>मुख्यमंत्री बाईट</u>**

वर्ष २०३५ पर्यंत सकल देशांतर्गत उत्पन्नातलं या क्षेत्राचं योगदान २५ टक्क्यांवर नेणं, १० कोटीपेक्षा जास्त रोजगार निर्माण करणं आणि जगातल्या तीन सर्वोच्च औद्योगिक उत्पादक देशांमध्ये भारताला स्थान मिळवून देणं, हे या आरखडयाचं उद्दिष्ट आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, तसंच नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही.आर. सुब्रह्मण्यम उपस्थित होते.

**<u>नीती आयोग मुख्यमंत्री</u>**

महाराष्ट्र सरकारननं निश्चित केलेलं २०४७ चं व्हिजन हे फक्त देशाच्या विकासाला हातभार लावणारं नाही तर, ते महाराष्ट्रातल्या नागरिकांना केंद्रित करणारं आणि भविष्यातील विकासाचा वेध घेणारं धोरण आहे. राज्याने विकसित भारताच्या प्रवासात आपली भक्कम भूमिका निश्चित केली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. पुण्यातील वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेमध्ये नीती आयोगच्या वतीनं नीती फ्रंटियर टेक हब : 'मॅन्युफॅक्चरिंगचे पुनरुज्जीवन' या उपक्रमाचं उद्‌घाटन फडणवीस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. भारतात कृषी-मूल्य साखळी विकास आणि ग्रामीण समृद्‌धी आणि प्राथमिक कृषी पत सहकारी संस्था मजबूत करणे या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

**<u>पुणे ग्रँड टूर मुख्यमंत्री</u>**

“पुणे ग्रँड टूर ही केवळ स्पर्धा नाही, तर पुण्याला नवी ओळख देणारी आणि अर्थव्यवस्थेला चालना देणारी स्पर्धा आहे”, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. ‘पुणे ग्रँड टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या बोधचिन्ह आणि जर्सीचं अनावरण मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत झालं. या स्पर्धेतून अंदाजे साडेआठशे कोटी रुपयांचा महसूल राज्य शासनाला मिळणार असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं. या स्पर्धेत १८ देशांचे ३४ संघ सहभागी होणार आहेत.

**<u>उत्पन्न</u>**

राज्य परिवहन महामंडळाला यंदाच्या दिवाळीत ३०१ कोटी रुपयांचं विक्रमी उत्पन्न मिळालं आहे. गेल्या वर्षीच्या दिवाळी हंगामातल्या उत्पन्नापेक्षा ते ३७ कोटी रुपयांनी जास्त आहे. दिवाळीच्या शेवटच्या दिवशी म्हणजे २७ ऑक्टोबरला ३९ कोटी ७५ लाख रुपये उत्पन्न मिळालं असून यंदाचं आतापर्यंतचं हे सर्वाधिक उत्पन्न आहे. सर्वाधिक उत्पन्न पुणे विभागाला मिळालं असून त्याखालोखाल जळगाव आणि नाशिक विभागाचा क्रमांक लागतो.

**बच्चू कडू**

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक आहे, बच्चू कडूंनी चर्चेसाठी मुंबईत यावं, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल  मांडली. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती,शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन, यांसह २० प्रमुख मागण्यांसाठी नागपुरात प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली  महाएल्गार आंदोलन सुरु आहे, त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री पुण्यात बोलत होते.

बच्चू कडू आणि समर्थक वर्धा-नागपूर महामार्गावरील कापूस संशोधन केंद्राच्या मैदानात ठिय्या आंदोलन केलं. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याची दखल घेत आंदोलकांना आंदोलन स्थळ रिकामे करण्याचे निर्देश दिले .

**निवडणूक आयोग हेल्पलाईन**

नागरिकांच्या शंका आणि तक्रारींचं निराकरण करण्यासाठी निवडणूक आयोगानं  राष्ट्रीय मतदार हेल्पलाइन आणि सर्व ३६ राज्यस्तरीय  आणि जिल्हास्तरीय हेल्पलाइन सक्रिय केल्या आहेत. राष्ट्रीय संपर्क केंद्र, सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्रीय हेल्पलाइन म्हणून काम करेल. ते दररोज सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १८००-११-१९५० या टोल-फ्री क्रमांकाद्वारे कार्यरत राहणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

**व्हीव्हीपॅट**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही, त्यामुळे आगामी निवडणुकीत व्हीव्हीपॅट वापरलं जाणार नाहीत, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. काही अपवाद वगळता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार घेतल्या जातात. त्यासाठी व्हीव्हीपॅट जोडणीची सुविधा असलेली मतदान यंत्रं

विकसित करण्याबाबत देशातील सर्व राज्य निवडणुक आयोगांची टेक्निकल इव्हॅल्यूशन कमिटी अभ्यास करत आहे, तिचा अहवाल अद्याप न आल्यानं व्हीव्हीपॅटचा वापर शक्य नाही, असं आयोगानं म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट-प्रशांत</u>**

कॅनबेरा मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतला  पहिला वीस षटकांचा सामना काल पावसामुळे रद्द करण्यात आला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर  पावसाने दोनदा सामन्यात व्यत्यय आणला. भारताने ९ पूर्णांक ४ षटकांत एका गड्याच्या मोबदल्यात ९७ धावा केल्या होत्या. खेळ थांबला तेंव्हा  गिल आणि सूर्यकुमार यादव यांनी ६२ धावांची भागीदारी केली होती. पुढील सामना उद्या मेलबर्न इथं खेळला जाणार आहे.

दरम्यान, महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध मुंबईत डी वाय पाटील मैदानावर खेळला जाणार आहे. मात्र या सामन्यावर पावसाचे सावट राहण्याची शक्यता आहे. दुसऱ्या दिवशी अतिरिक्त राखीव दिवस निश्चित करण्यात आला आहे. निकालासाठी दोन्ही संघांना किमान २० षटके फलंदाजी करण्याची संधी असणे आवश्यक आहे. राखीव दिवशी कोणताही निकाल न लागल्यास, ऑस्ट्रेलिया अंतिम फेरीत पोहोचणार आहे.

**<u>पाऊसरत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात काल  दुपारनंतर पावसाने जोर धरला असून, रत्नागिरी, राजापूरसह जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये आताही मुसळधार पाऊस सुरू आहे.  सोलापूर शहरासह महाराष्ट्र आणि इतर राज्यांना मंथा चक्रीवादळाचा फटका बसण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली होती त्यानुसार दक्षिण सोलापूर तालुक्याच्या अनेक भागांतही जोरदार पाऊस झाला. पुण्यातही आज पहाटेपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे.

**<u>हवामान</u>**

उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**